|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**संशोधन विभाग**

**जा.क्र.** कबचौउमवि/११/संशोधन/ 553 /२०२६ **दिनांक**: २०/०४/२०२६

**प्रति,**
**संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक**

**विषय : १. कच्चा प्रबंध व अंतिम प्रबंध लॉगिन मध्ये अपलोड करतांना येणाऱ्या अडचणीबाबत**
**२. सामाजिक दृष्टया सबंधित विषयांचे संशोधन विषय निवडण्याबाबत**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थी व मार्गदर्शक यांना कळविण्यात येते की, मा. अधिसभेच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कळविण्यात येते की संशोधक विद्यार्थ्यांना कच्चा प्रबंध व अंतिम प्रबंध File Comprees करुन ती ३ MB पर्यंत आणने बाबत अडचणी आल्यास संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन विभागाकडून नियमित मार्गदर्शन केले जाते.

तथापि सदर कार्यवाही विद्यार्थ्यांना अवगत होणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही विद्यार्थ्यांनी करावी.
कच्चा प्रबंध/अंतिम प्रबंध (Thesis) च्या Soft Copy ची साईज ३ MB पर्यंत करता येणे शक्य नसल्यास

१. प्रबंधाची मूळ File PDF Format मध्ये तयार करावी.
२. सदर PDF File Google Drive वर Upload करावी.
३. त्याची Link तयार झाल्यानंतर Link for All Access नमूद करावी व ही Link Copy करावी.
४. ही Link MS Office मध्ये Word File तयार करुन त्यावर Paste करावी व या एका पेजेस ची PDF File तयार करुन ती OAASIS Login द्वारा Upload करावी.
५. कच्चा प्रबंध/अंतीम प्रबंधाचे Google Drive वर Upload केलेली File Delete करु नये अन्यथा सदर प्रबंध दिसणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

२. तसेच मा. अधिसभेत झालेल्या चर्चेनुसार संशोधक विद्यार्थी यांनी संशोधनाचा विषय निवडतांना सामाजिकदृष्टया उपयोगी पडणारा, समस्यांवर पर्याय शोधणारा असे विषय निवडावे जेणेकरुन संशोधनाचा फायदा समाजास व देशाला होऊ शकेल.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

आपला विश्वासू,

( प्रविण एम. चंदनकर) 20/4
सहा.कुलसचिव
संशोधन विभाग

**प्रत माहितीसाठी**

**मा. प्र-कुलगुरु महोदय कबचौउमवि, जळगाव**

☎ : (९१) ०२५७-२२५७२२४-२८४ ( र्यालय)
फॅक्स : (९१) ०२५७-२२५८५४०३ व २२५८४०६
वेबसाईट : www.nmu.ac.in
pvcresearch@nmu.ac.in